आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१३ सप्टेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- नौदलासाठी तयार केलेल्या VLSRSAM क्षेपणास्त्राची चाचणी सलग दुसऱ्या दिवशी यशस्वी

- ५ अब्ज २५ कोटी डॉलरची वाढ होऊन देशाचा परकीय चलन साठा विक्रमी पातळीवर
- जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची उद्या डोडा इथं सभा

- अंदमान आणि निकोबार मधल्या पोर्ट ब्लेअरचं नामकरण श्री विजय पुरम असं करण्याची केंद्रीय गृहमंत्र्यांची घोषणा

**आणि**

- पुरुषांच्या आशियाई हॉकी चषक स्पर्धेत उद्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना रंगणार

**<><><><><>**

नौदलासाठी तयार केलेल्या VLSRSAM क्षेपणास्त्राची चाचणी सलग दुसऱ्या दिवशी यशस्वी झाली. जमिनीवरुन हवेत मारा करु शकणाऱ्या या क्षेपणास्त्राची ओदिशात चंडीपूर इथं कालही एक चाचणी झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी या कामगिरीबद्दल संरक्षण संशोधन आणि विकास संघटना डीआरडीओचं अभिनंदन केलं. या क्षेपणास्त्रानं अत्यंत कमी उंचीवरून उडणाऱ्या आणि रडारवर न दिसणाऱ्या अतिवेगवान हवाई लक्ष्यावर अचूक हल्ला केला आणि लक्ष्य निष्प्रभ करण्याची आपली क्षमता सिद्ध केली.

**<><><><><>**

देशाच्या परकीय चलन साठ्यात ५ अब्ज २५ कोटी डॉलरची वाढ होऊन तो ६८९ अब्ज २३ कोटी डॉलरच्या विक्रमी स्तरावर पोहचला, अशी माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेनं दिली आहे. दरम्यान, परदेशी चलन साठ्याचा महत्वपूर्ण घटक असणाऱ्या परदेशी चलन मालमत्तेत देखील ५ अब्ज ११ कोटी डॉलरची वाढ होऊन ती ६०४ अब्ज १४ कोटी डॉलरवर पोहोचली आहे. दरम्यान, देशाच्या सुवर्ण भांडाराचे आरक्षित मूल्य १२ कोटी ९ लाख डॉलरने वाढून ६१ अब्ज ९९ कोटी डॉलर इतकं झालं आहे. तर, आंतरराष्ट्रीय चलन साठ्यात देशाचा आरक्षित साठा ९० लाख डॉलरने वाढून ४ अब्ज ६३ कोटी डॉलरवर पोहोचल्याचं आरबीआयनं सांगितलं आहे.

**<><><><><>**

शिक्षण म्हणजे केवळ पदवी नसून समाजातली असमानता दूर करून समानता स्थापित करणारं माध्यम आहे, असं प्रतिपदान उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. ते आज राजस्थानात अजमेर इथं केंद्रीय विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांना संबोधित करत होते. विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यात उच्च शिक्षणाची भूमिका महत्वपूर्ण असेल, असंही ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानात रोज नवीन भर घातली पाहिजे, असं त्यांनी सांगितलं. स्वातंत्र्य संग्रामात बलिदान देणाऱ्या वीरांचं स्मरण ठेवून विद्यार्थ्यांनी आपल्या प्रत्येक कृतीत प्रथम राष्ट्रहिताचा विचार करावा, असं आवाहन उपराष्ट्रपतींनी केलं.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरमध्ये होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सभा घेणार आहेत. जम्मू कश्मीरच्या डोडा जिल्ह्यात

भाजपच्या रॅलीला ते संबोधित करतील. या भागातल्या तीन जिल्ह्यांत १८ सप्टेंबर रोजी मतदान होईल. प्रधानमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर या भागात सर्वत्र कडेकोट बंदोबस्त आहे. या नंतर १९ सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री श्रीनगरला भेट देतील. दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी जाहीरनामा प्रकाशित केला आहे. या जाहीरनाम्याची घोषणा आज पक्षाचे जम्मू-काश्मीरचे प्रदेशाध्यक्ष मनीष साहनी यांनी वार्ताहर परिषदेत केली. या जाहीरनाम्यात मुगल रोडचं नामांतर, जम्मू तसंच श्रीनगर विमानतळाचं नामकरण तसंच, कटरा इथे डोगरा संग्रहालय अशा आश्वासनांचा समावेश आहे.

**<><><><><>**

चौथ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाला उद्यापासून आरंभ होत असून नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित या हीरक महोत्सवी विशेष सोहळ्याचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी एक विशेष टपाल तिकिट आणि नाणं प्रकाशित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात केंद्रीय गृह मंत्रालयाअंतर्गत असलेल्या राजभाषा विभागांतर्गत भारतीय भाषा विभागाचं उद्घाटन तसंच अनेक पुस्तकं आणि मासिकांचं  प्रकाशन करण्यात येणार आहे.

केंद्रीय गृहमंत्र्यांचा राजभाषा दिनानिमित्तचा विशेष संदेश उद्या सकाळी सात वाजून दहा मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित करण्यात येणार आहे. त्यामुळे यावेळी दररोज पुणे केंद्रावरुन प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या सकाळी पावणेसात ते सहा वाजून ५५ मिनिटं या वेळेत प्रसारित होईल.

**<><><><><>**

केंद्रसरकारने कांद्याच्या निर्यातीकरता लावलेली किमान दर मर्यादा हटवली आहे. परदेश व्यापार महासंचालनालयाने आज त्याची अधिसूचना जारी केली.

यापूर्वी सरकारने प्रतिटन साडेपाचशे अमेरिकी डॉलर्स किमान दराची मर्यादा निर्यातीसाठी लावली होती. देशांतर्गत बाजारपेठेत कांद्याचे दर आणि पुरवठा स्थिर राखण्याच्या दृष्टीने हे पाऊल उचललं होतं. देशांतर्गत बाजारपेठेत कांद्याचा पुरवठा आणि दर स्थिर राखण्याच्या उद्देशानं हे पाऊल उचललं होतं.

**<><><><>**

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आज मुंबईत आले होते. त्यांनी विविध ठिकाणच्या गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांना भेट देऊन दर्शन घेतलं. उपनगरीय रेल्वेतून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते विक्रोळी असा प्रवास त्यांनी केला.  मुंबईत रेल्वेच्या पायाभूत सुविधांच्या अद्ययावतीकरणासाठी आगामी काळात प्रस्तावित असलेल्या १२ महत्त्वाच्या प्रकल्पांची चर्चा त्यांनी या प्रवासादरम्यान केली.

**<><><><>**

लंडनमध्ये सुरुवातीला घरगुती स्वरुपात होणारा गणेशोत्सव साजरा होत होता. आता भाविकांची संख्या वाढल्यानं गेल्या काही वर्षात याला सार्वजनिक स्वरुप आलं आहे. विविध भाषा आणि प्रांतातले नागरिक यात सहभागी होतात. ब्रिटनमधल्या याच गणेशोत्सवाविषयी अधिक माहिती देताना जयश्री काशीद यांनी आकाशवाणीला सांगितलं…

**होल्ड जयश्री काशीद, ब्रिटन**

**<><><><>**

केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या जनसुनवाई पोर्टलच अनावरण पीयूष गोयल यांनी आज मुंबईत केलं. व्यापार आणि उद्योग क्षेत्रातल्या व्यावसायिकांना याद्वारे प्रशासनासोबत थेट आणि पारदर्शकरित्या संवाद साधता येणार आहे. चहा, कॉफी, मसाले, रबर महामंडळ, अपेडा, परदेश व्यापार महासंचलनालय यांच्यासारख्या मंत्रालयाअंतर्गत

येणाऱ्या विभागांचा यात समावेश आहे. ECGC च्या सुधारित SMILE-ERP सुविधेचं लोकार्पणही त्यांनी केलं. जनसुनवाणी पोर्टलच्या माध्यमातून निर्यातदारांना त्यांच्या समस्या घरबसल्या सोडवता येणार आहेत. व्यापार मंडळाच्या सदस्यांची बैठकही त्यांनी घेतली.

**<><><><><>**

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय आणि बौद्ध महासंघाने संयुक्तरित्या उद्या मुंबईत बुद्धाचा मध्यम मार्ग या विषयावर एक दिवसीय परिषदेचं आयोजन केलं आहे. वरळी इथल्या नेहरू विज्ञान केंद्रात ही परिषद होणार असून केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजीजू प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. आधुनिक काळात बौद्ध धम्माची भूमिका आणि प्रासंगिकता, मानवी मनातील जाणीवांशी संबंधित तंत्राचे महत्त्व आणि नव्या युगाचे नेतृत्व आणि बौद्ध धम्माची अंमलबजावणी अशा तीन विषयांवरच्या चर्चासत्रांचा या परिषदेत समावेश असेल.

**<><><><><>**

लोकसभतले विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहूल गांधी यांच्या आरक्षणा संदर्भातल्या कथित वक्तव्या विरोधात आज भाजपातर्फे महाराषट्रात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आलं.

**हिंगोली**,**नंदुरबार,** आणि **पालघर** जिल्ह्यात भाजपाचे लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी निदर्शनं केल्याचं आमच्या वार्ताहरांनी कळवलं आहे.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही राहूल गांधी यांच्या कथित वक्तव्याचा निषेध केला आहे. दलित, आदीवासी यांचं आरक्षण कोणीच हिरावून घेऊ शकत नाही, असं धरमशाला इथं एका कार्यक्रमात ते म्हणाले.

**<><><><><>**

देशात लोकशाही नाही असं मानणाऱ्या राहूल गांधी यांच्या पक्षाचे 99 खासदार कसे निवडून आले, असा प्रश्न केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केला आहे. ते आज धर्मशाला इथं दौऱ्यावर असताना बातमीदारांशी बोलत होते. राहुल गांधी  लोकशाहीमुळेच ते विरोधी पक्षनेता बनू शकले आहेत, असा दावा त्यांनी केला. हिमाचल प्रदेश मधल्या मंडी इथं मशिदी वरून झालेल्या वादावर ते म्हणाले की, संविधानाच्या अंतर्गत कायदेशीर मार्गानं तोड़गा काढावा.

**<><><><><>**

पुरुषांच्या आशियाई हॉकी चषक स्पर्धेत उद्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. चीनमधल्या मोकी इथल्या मैदानावर होणारा हा सामना, या स्पर्धेतला भारताचा पाचवा सामना आहे. यापूर्वी भारतीय संघानं चीनला ३-०, जपानला ५-१, मलेशियाला ८-१ आणि कोरियाला ३-१ असं नमवलं आहे. गुणतालिकेत पहिलं स्थानी असलेल्या भारताचं उपांत्य फेरीतलं स्थान निश्चित झालंय. पाकिस्ताननं आतापर्यंत स्पर्धेतले २ सामने जिंकले असून २ बरोबरीत सोडवले आहेत. गुण तालिकेत पाकिस्तान दुसऱ्या स्थानी आहे.

**//<><><><><>//**